# मराठी शाळेचे चार स्तंभ

– by HMM Marathi Shala

"हसत खेळत मराठी शिकूया", हे मराठी शाळेचे ध्येय आहे. मुलांना आवडेल आणि समजेल अश्या पद्धतीने आम्ही मराठी शिकवतो

## वाचणे



भाषा शिकायला आणि भाषा वापरायला लागणारे सर्वात महत्वाचे साधन, वाचन. अक्षर ओळख असो, बाराखडी असो, जोडाक्षर, हे सर्व वाचण्यात सहयोगी होते. आम्ही मुलांना क्रमाक्रमाने वाचायला शिकवतो, त्यांच्या वयाला बघता आणि त्यांची वाचन पातळी बघून.

## बोलणे

वर्गात इतर मित्रांशी बोलणे, एखाद्या गोष्टीचे वर्णन करणे, मराठीत संभाषण करणे, अश्या रितीने मराठी संवादाची उजळणी होते.



## लिहिणे



शिकलेली भाषा वापरता यावी ह्यासाठी लिखाण महत्वाचे आहे. अक्षर ओळख, बाराखडी, जोडाक्षरे, वाक्य, उतारा, निबंध, पत्र, चित्रवर्णन, शुद्धलेखन, श्रुतिलेखन, भाषांतर, वगैरे, असे अनेक वाचनाचे प्रकार आम्ही मुलांना लिहायला शिकवतो.

## ऐकणे

बोलणे आणि ऐकणे ह्याची उजळणी एकाच वेळेस वर्गात सुरु असते. शिवाय गोष्टी, आकलन, प्रश्न–उत्तरे, कविता अश्या अनेक माध्यमांमधून आम्ही वर्गात मराठी ऐकतो.



## पालक म्हणून तुम्ही काय मदत करू शकता?

– मुलांना **शिस्तीची** शिकवणी द्या, उ.दा.शाळेत वेळेवर येणे, वर्ग स्वच्छ ठेवणे, शिक्षकांना मान देणे, शिकलेल्या अभ्यासाची उजळणी नियमितपणे करणे.
– मुलांना **गृहपाठ** करायला प्रोत्साहन द्या – ह्याने शाळेत शिकवलेल्याची उजळणी होते.
– मुलांशी मराठीतून घरी **संवाद** करा किंवा आजी–आजोबांशी/ नातेवाईकांशी मराठीत बोला – ह्याने त्यांच्या कानावर मराठी पडते आणि त्यांना बोलायची इच्छा होते.
– मुलांना मराठी **गाणी, कविता, गोष्टी ऐकवा**.
– मुलांना मराठी **वाचायला** सांगा, उदा. आजीचे पत्र/ई–मेल, एखादे गोष्टीचे पुस्तक किंवा कविता, भारतात गेल्यावर दिसणाऱ्या पाट्या, वगैरे.
– मुलांना मराठीत **लिहायला** प्रोत्साहन द्या उदा. एखादा निबंध, आजी–आजोबांना पत्र, चित्रवर्णन, वगैरे.

दिवसातला काही वेळ मुलांबरोबर मराठीत घालवा!